दिपमाळा दिवाळी अंक २००९

चैताली सादर करते. कार्यक्रमापूर्वी तास-दोन तास ती मौन पाळते. मनातल्या मनात ती कार्यक्रमाची आखणी करीत असते. कार्यक्रमामधून शक्यतो तेच तेच विनोद न सांगता चालू काळाचं भान ठेवून ती विनोद सांगते. नकला करतानाही ती हे पथ्य पाळते. नवीन नवीन नकला करण्याचा प्रयत्न करीत असते. म्हणूनच तिचा प्रत्येक कार्यक्रम ताजातवाना वाटतो. उत्स्फूर्त जाणवतो. चैताली सांगते, 'आजूबाजूच्या माणसांचं निरीक्षण करणं हा माझा आवडता छंद आहे. त्यातूनच मला काही गोष्टी सुचत जातात. नकला करायची मला लहानपणापासूनच सवय होते. मोठेपणी माणसं वाचायीही सवय लागली. उदाहरणच द्यायचं झालं, तर आपण सगळे फोनवर बोलताना वेगवेगळ्या पद्धतीने बोलतो. त्या पद्धतीचं निरीक्षण करून मी ते सादर करते किंवा एखाद्याची विशिष्ट लकब असते, सवय असते, ती मी लक्षात ठेवते. त्याचा मला माझ्या कार्यक्रमात खूप उपयोग होतो. वाचनही खूप करते. त्यातून विनोद, चुटकुले जमवते.

एवढे मेहनत घेतल्यावर त्या कार्यक्रमाला यश न मिळेल तरच नवल! आतापर्यंतच्या सादरीकरणातील लतादीदींची मिमिक्री आणि डॉनची ऑडिशन म्हणजे डॉन सिनेमा मराठीत निघाला, तर एकच संवाद विविध क्षेत्रांतील अभिनेते कसा म्हणतील? त्याची ती नक्कल आहे- या प्रकारांना प्रेक्षकांनी चैतालीला भरभरून दाद दिली आहे.

चैतालीलाही या नकला करायला मनापासून आवडते. रसिकांच्या काही प्रतिक्रिया तिने अगदी मनाच्या कप्प्यात जपून ठेवल्या आहेत. मातोश्री वृद्धाश्रमामध्ये चैतालीने जेव्हा कार्यक्रम केला, तेव्हा तिथल्या लोकांनी उत्स्फूर्तपणे कार्यक्रम आवडल्याचे सांगितले. 'महिन्यातून एकदा तरी तू आमच्या येथे कार्यक्रम करीत जा' असा आग्रहही केला आहे. त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद, फुललेलं हसू चैताली कधीही विसरू शकत नाही.

दुसरं म्हणजे विविध ठिकाणी कार्यक्रम करताना बायकांच्या प्रतिक्रिया फार बोलक्या असतात. 'आम्हाला संधी मिळाली नाही, आमच्या मनात असून, आम्हाला जे जमलं नाही, ते तू करतेस. तुझ्यामध्ये आम्ही आम्हाला बघतो, आम्हाला खरोखरीच तुझा अभिमान वाटतो. या प्रतिक्रिया चैतालीला पुढचा कार्यक्रम करायला हुरूप, आनंद देतात.

अजूनही या क्षेत्रात मुली कमी येताहेत. या क्षेत्रात भरपूर वाव आहे, संधी आहेत. जास्तीत जास्त तरुण मुलींनी या क्षेत्रात यायला पाहिजे, असा तिचा आग्रह आहे. कोणत्याही क्षेत्रात धोके असतातच; पण आपण धाडस दाखविले पाहिजे. त्याचबरोबर आपल्या मनाचा रिमोट कंट्रोल आपल्या हातात असल्यावर आपण कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होऊ शकतो, हा विश्वास चैतालीच्या बोलण्यातून जाणवत होता.

आपल्या कार्यक्रमांमधून वेळ काढून चैताली सूत्रसंचालन आणि निवेदन या संदर्भातील दोन दिवसांच्या कार्यशाळा आयोजित करते. या कार्यशाळांमध्ये अगदी लहान लहान गावांमधूनही विद्यार्थी शिकायला येतात. वयाची कोणतीही अट नसते. या कार्यशाळेमध्ये ओंकार साधना, स्टेजवर बोलायचं कसं, वावरायचं कसं, आवाजाचे चढ-उतार या संबंधींचे मार्गदर्शन केलं जाते. काही प्रात्यक्षिकेही घेतली जातात. उदाहरणार्थ - मानपत्राचे वाचन, उताऱ्यांचे वाचन, संहिता लेखन इत्यादी. आतापर्यंत या कार्यशाळेचा १५० विद्यार्थ्यांनी लाभ घेतल्याचे चैताली सांगते. या संदर्भात मार्गदर्शनपर पुस्तक लिहिण्याचा तिचा मानस आहे. चैतालीच्या या कार्यक्रमाची दखल अनेकजणांनी घेतली आहे.

- पुणे फेस्टिव्हलतर्फे आयोजित 'हास्यभूषण पुरस्कार' (२००७ ते ०८)
- कलारंग संस्थेतर्फे 'कलागौरव पुरस्कार' (२००९)
- 'रोटरॅक्ट' संस्थेतर्फे 'पुण्याभिमान पुरस्कार' (२००९)

असे विविध पुरस्कार तिला मिळालेले आहेत. 'झी' मराठीच्या 'हास्यसम्राट' या कार्यक्रमात ती उपांत्यफेरीत (२००८) पोहोचली होती.

या सगळ्या यशाचे श्रेय चैताली वडील माणसांचे आशीर्वाद आणि शुभेच्छा यांना देते. त्याचबरोबर तिचे पती भूषण भंडारी आणि त्यांचे कुटुंबीय यांचे प्रोत्साहन तिला सतत लाभत असते. यांच्या सहकार्याचा ती आवर्जून उल्लेख करते.

आजच्या स्पर्धेच्या युगात केवळ मुलगी असण्याचा फायदा न मिळता केवळ अभिनयाच्या इच्छा ठेवणारी चैताली म्हणूनच वेगळी ठरते. दुसऱ्यांना जेवढा आनंद देता येईल, तेवढा आनंद देणारी, सदाफुलीसारखी सतत हसरी असणारी चैताली दुसऱ्यांनाही आनंदी ठेवून सतत हसायला लावते. तिने विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन गाठलेलं हे यशाचे शिखर नक्कीच नोंद घेण्याजोगे आहे. म्हणूनच 'गंमत-जंमत' कार्यक्रमामधील 'गंमत' प्रत्यक्ष अनुभवायला हवी आणि त्यातील 'जंमती'चा लाभ घ्यायला हवा.

**पत्ता :** ४, सर्वांकिता, भुसारी कॉलनी, पौड रोड,
पुणे - ३८. दूरध्वनी : २५२८०३५१.
मोबाईल : ९८५०१७४३६३, ९८९०७२९९७२.